दैनिक

# हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com | Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ रविवार, दि. २८ जून २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ६९ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


## सवलतीसाठी आता एक ऑगस्टपासून 'एनसीएमसी' बंधनकारक

**मुंबई :** राज्य मार्ग परिवहन (ST) महामंडळाच्या बसमधील सवलतीच्या प्रवासासाठी १ ऑगस्टपासून नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (NCMP) अनिवार्य करण्यात आले आहे, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिकांना सुरुवातीला ही अट लागू होणार असून, पुढील टप्प्यात विद्यार्थी, दिव्यांग, पुरस्कारार्थी यांच्यासह सर्व सवलतधारक प्रवाशांनाही हे कार्ड बंधनकारक केले जाणार आहे. एसटी महामंडळाकडून सध्या सुमारे ३५ प्रकारच्या प्रवाशांना विविध सवलती दिल्या जातात.


**पाहिजेत**

श्री VARAD CONSTRUCTION

श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी संभाजीनगर येथे 3 वर्ष अनुभव असलेल्या सिव्हिल इंजिनिअर च्या जागा भरणे आहे.इच्छुक उमेदवार यांनी ईमेल आयडी नंबर shrivaradconstructionco@gmail.comवर आपले अर्ज पाठवावे किंवा मोबाईल नंबर 9923104521/9226611011वर संपर्क साधावा.

कार्यालय : श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी, नंबर 515,5वा माळा, वास्तू इलाईट स्क्वेअर बीड बायपास रोड छत्रपती संभाजी नगर येथे कार्यालयीन वेळेत समक्षात भेटावे.


## थोडक्यात वार्ता

### जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ

**मुंबई :** गेल्या काही वर्षांतील नैसर्गिक संकटांमुळे राज्यातील बळीराजा पुरता कोलमडून गेला आहे. त्यामुळे त्याला आधार देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस(devendra fadnavis) यांनी यंदाच्या अर्थसंकल्पात 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' जाहीर केली. या योजनेची अंमलबजावणी आता अंतिम टप्प्यात आली असून, जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांमध्ये कर्जमुक्तीची रक्कम जमा होण्यास सुरुवात होणार आहे. विविध प्रवर्गातील शेतकऱ्यांचा विचार करून या योजनेती आखणी करण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने तीन घटकांचा समावेश आहे. जे शेतकरी थकबाकीदार आहेत, अशा पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमुक्तीचा लाभ दिला जात आहे. यापूर्वीच्या 'महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजने'चे लाभार्थी असलेल्या पात्र शेतकऱ्यांसाठीही शासनाने यात विशेष व स्वतंत्र तरतूद केली आहे.

### 'पैशांचा पाऊस' साठी गुप्त विधी?; छापा, 7 जण अटकेत

**मालेगाव :** मालेगाव तालुक्यात अंधश्रद्धा आणि अघोरी पूजेचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. मुंगसे (Mungse) शिवारातील एका फार्महाऊसवर मध्यरात्री सुरू असलेल्या गुप्त अघोरी पूजेवर तालुका पोलिसांनी अचानक छापा टाकत सात जणांना अटक केली आहे. घटनास्थळावरून जादूटोण्यासाठी वापरले जाणारे साहित्य जप्त करण्यात आले असून, मुख्य 'भगत' मात्र अंधाराचा फायदा घेत पसार झाला आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, मुंगसे येथील एका व्यापाऱ्याच्या फार्महाऊसवर रात्रीच्या अंधारात काही जण गुप्त पूजा आणि जादूटोणा करत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी मध्यरात्री फार्महाऊसवरील सालदाराच्या घरावर धाड टाकली. पोलिसांनी घरात प्रवेश करताच अघोरी पूजेची मांडणी आणि त्याभोवती बसलेले काही जण दिसून आले.

### टीईटी पेपरफुटीतील सूत्रधारांवर मकोका लावावा : एकनाथ शिंदे

**मुंबई, :** टीईटी परीक्षेच्या पेपरफुटीची घटना अत्यंत संतापजनक असून, या प्रकरणातील मुख्य सूत्रधार आणि आरोपींवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (MCOCA) कारवाई करण्यासाठी आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी सविस्तर चर्चा करणार असल्याचेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले आहे. या प्रकरणाची सखोल, निष्पक्ष आणि अत्यंत कठोर चौकशी केली जाईल. दोषी कोणत्याही पदावरील असो किंवा कोणत्याही संघटित टोळीचा भाग असो, त्याला कोणतीही सवलत दिली जाणार नाही. संबंधितांवर कायद्यानुसार कठोरात कठोर कारवाई करण्यात येईल. राज्य सरकार भ्रष्टाचाराविरोधात 'झिरो टॉलरन्स' धोरणावर काम करत असून, पेपरफुटी हा प्रकार केवळ गैरव्यवहार नसून संघटित गुन्हेगारीचे स्वरूप धारण करणारा गंभीर अपराध असल्याचेही त्यांनी नमूद केले.

### मुंबई मेट्रोत प्रवाशाकडून गांज्याची 9 पाकिटे जप्त

**मुंबई :** मुंबई मेट्रो वनच्या सुरक्षा व्यवस्थेने पुन्हा एकदा आपली कार्यक्षमता सिद्ध केली आहे. एअरपोर्ट मेट्रो स्थानकावर नियमित सुरक्षा तपासणीदरम्यान एका प्रवाशाकडून संशयित गांजा (मारिजुआना) जप्त करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, ही कारवाई एका महिला सुरक्षा रक्षकाच्या सतर्कतेमुळे शक्य झाली असून आरोपीला पळून जाण्याचा प्रयत्न करत असतानाच सुरक्षा कर्मचाऱ्यांनी पकडले. घटनेनुसार, घाटकोपरकडे जाणाऱ्या प्रवेशद्वारावर नियमित बॅगेज स्कॅनिंग सुरू असताना महिला सुरक्षा रक्षक कांचन पांडे यांनी एका प्रवाशाच्या बॅगेतील संशयास्पद वस्तू ओळखली. त्यानंतर बॅगेची सखोल तपासणी करण्यात आली असता त्यामध्ये गांज्याची नऊ पाकिटे आढळून आली.

## "खरं की काय"




# पेपरफुटीचे ग्रहण : ऐनवेळी टीईटीची परीक्षा रद्द!

**पुणे :** राज्यातील लाखो डी.टी.एड (D.T.Ed) आणि बी.एड (B.Ed) धारक तरुण-तरुणींना मोठा धक्का बसला आहे. उद्या, म्हणजेच २८ जून २०२६ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात आयोजित करण्यात आलेली 'शिक्षक पात्रता परीक्षा' (TET) अचानकपणे पुढे ढकलण्यात आली आहे. या परीक्षेसाठी तब्बल ६ लाख १२८ विद्यार्थ्यांनी जोरदार तयारी केली होती. मात्र, परीक्षेच्या अवघे काही तास शिल्लक असतानाच हा निर्णय जाहीर झाल्यामुळे राज्यभरातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड गोंधळ आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

भिवंडीत नेमकं काय घडलं?

सध्या सोशल मीडियावर महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे एक पत्र वाऱ्यासारखे व्हायरल होत आहे, ज्यात या पेपरफुटीचा खळबळजनक उलगडा करण्यात आला आहे. आज (२७ जून) पहाटे भिवंडीत एक मोठी पोलीस कारवाई पार पडली. पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे त्यांनी काही संशयितांवर पहाटे सकाळीच धाड टाकली. या कारवाईत संशयितांकडे उद्या होणाऱ्या 'टीईटी' परीक्षेतील काही प्रश्न हुबेहूब जुळत असल्याचे आढळून आले. तातडीने परीक्षा परिषदेच्या अधिकाऱ्यांना घटनास्थळी पाचारण करून याची पडताळणी करण्यात आली आणि प्रश्न समान असल्याचे निष्पन्न झाले. या धक्कादायक प्रकारानंतर भिवंडी पोलीस ठाण्यात तात्काळ गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

'NEET' च्या धसक्यानंतर प्रशासनाची खबरदारी


देशात नुकत्याच उघडकीस आलेल्या 'NEET 2026' परीक्षेतील महाघोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर, राज्य परीक्षा परिषदेने आधीच कडक सुरक्षा व्यवस्था तैनात केली होती. राज्यात एकूण १,०२८ (काही अधिकाऱ्यांच्या मते १,७२८) केंद्रांवर ही परीक्षा पार पडणार होती. मात्र, भिवंडीतील या प्रकारानंतर परीक्षा पूर्णपणे पारदर्शक वातावरणातच पार पडावी आणि या पेपरफुटी प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी, या उद्देशाने प्रशासनाने उद्याची परीक्षा रद्द करण्याचा मोठा निर्णय घेतला.

परीक्षा परिषदेच्या उपायुक्त काय म्हणतात ?

या सर्व गोंधळावर पडदा टाकत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या उपायुक्त प्रिया शिंदे यांनी वृत्तवाहिन्यांशी बोलताना अधिकृत माहिती दिली. त्यांनी सांगितले की, "राज्यभरातील हजारो केंद्रांवर ६ लाखांहून अधिक विद्यार्थी ही परीक्षा देणार होते आणि सर्व अधिकारी पूर्वतयारीसाठी केंद्रांवर उपस्थित होते. मात्र, काही 'तांत्रिक कारणास्तव' ही परीक्षा तूर्तास पुढे ढकलण्यात आली आहे. परीक्षेची नवीन तारीख आणि वेळ लवकरच विद्यार्थ्यांना अधिकृत सूचनेद्वारे कळवली जाईल."

विद्यार्थ्यांचे हाल आणि पुढील दिशा

परीक्षेसाठी अनेक विद्यार्थ्यांनी दूरवरच्या शहरांमध्ये प्रवासाचे नियोजन केले होते. काहींनी गाड्या पकडल्या होत्या, तर काहींनी राहण्याची सोय केली होती. मात्र, ऐनवेळी आलेल्या या बातमीमुळे त्यांचे प्रचंड हाल झाले आहेत. विद्यार्थ्यांचे मोठे आर्थिक आणि मानसिक नुकसान झाले आहे. परीक्षा परिषदेने विद्यार्थ्यांना स्पष्ट केले आहे की त्यांनी सोशल मीडियावरील कोणत्याही खोट्या अफवांवर विश्वास ठेवू नये. टीईटी परीक्षेबाबतची सर्व अद्ययावत माहिती आणि नवीन वेळापत्रक केवळ महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकृत वेबसाईटवरच प्रसिद्ध केले जाईल. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अधिकृत पोर्टलच्या संपर्कात राहावे.



### 'ही तरुणांच्या भविष्याची चोरी' - राहुल गांधी

**या प्रकरणावर विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवरील पोस्टमधून प्रतिक्रिया दिली आहे.**

**राहुल गांधी यांनी लिहिलं, "आणखी एक पेपरफुटी. आणखी एक परीक्षा रद्द. यावेळी महाराष्ट्राची टीईटी परीक्षा. देशातील शिक्षण आणि परीक्षा व्यवस्था ही वसुलीची व्यवस्था बनवण्यात आली आहे, ज्यामुळे देशातील प्रत्येक तरुण असुरक्षित आहे."**

**ते पुढे म्हणाले, "ही केवळ पेपरफुटी नाही, तर तरुणांच्या भविष्याची चोरी आहे."**

### 'हे कमकुवत सरकार आहे', दानवेंची टीका

**या प्रकरणावर शिवसेना उद्धव बाळासाहेब पक्षाचे आमदार अंबादास दानवे यांनी सरकारवर टीका करत जाब विचारला. माध्यमांना प्रतिक्रिया देताना दानवे म्हणाले, "या सरकारला साधा टीईटीचा पेपर सांभाळता येत नाही. नीट पेपरफुटीचं केंद्र महाराष्ट्रात आहे, हे सरकार गुड गव्हर्नन्सच्या गोष्टी करतं, हे सरकार झिरो टॉलरन्सच्या गोष्टी करतं." "कुठे गुड गव्हर्नन्स आहे, कुठे झिरो टॉलरन्स आहे? एवढ्या नीटच्या लोकांना जेलमध्ये टाकलं तरी टीईटीचा पेपर फुटतो. याचाच अर्थ सरकारचा पेपरफुटीमध्ये कुठेतरी सहभाग आहे."**

**पुढे बोलताना दानवे म्हणाले, "जे शिक्षक भावी पिढी घडवणार आहेत, त्या शिक्षकांची पात्रता परीक्षेचा पेपर फुटतो, याचा अर्थ आपण कुठे चाललोय हे पाहण्याची आवश्यकता आहे."**

**"हे कमकुवत सरकार आहे, भ्रष्टाचारी सरकार आहे. म्हणून या सर्व गोष्टी होत आहेत. या छोट्या परीक्षेचा पेपर सरकार सांभाळू शकत नाही, याचाच अर्थ हे सरकार भगवान भरोसे चालू आहे."**

## नाशिकच्या मुंबई-आग्रा महामार्गावर भीषण अपघात; कारच्या धडकेत दोघांचा दुर्दैवी मृत्यू

**मुंबई :** नाशिकच्या मुंबई-आग्रा महामार्गावर शुक्रवारी सायंकाळी झालेल्या एका भीषण अपघातात पती-पत्नीचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. प्राप्त माहितीनुसार, राणेनगर ते इंदिरानगर दरम्यान महामार्गावरील उड्डाणपुलाचे रुंदीकरण आणि दुरुस्तीचे काम सुरू आहे. या कामावर मध्यप्रदेशातील पुरानाखेडा येथील रहिवासी नन्नेभाई भगवानदास आदिवासी (वय ५६) आणि त्यांच्या पत्नी राधारानी नन्नेभाई आदिवासी (वय ५५) हे दोघे मजूर म्हणून कार्यरत होते. शुक्रवारी दि. २६ जून रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास हे दाम्पत्य आपली कामाची पाळी संपवून रस्ता ओलांडत होते. दरम्यान, पाथर्डी फाट्याकडून द्वारकाच्या दिशेने भरधाव वेगाने जाणाऱ्या एमएच १५ एचएम २१५३ क्रमांकाच्या कारने त्यांना जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, दोघेही रस्त्यावर फेकले जाऊन गंभीर जखमी झाले. घटनेनंतर स्थानिक नागरिक आणि सहकाऱ्यांनी तातडीने त्यांना उपचारासाठी नाशिकच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारादरम्यान शुक्रवारी रात्री नन्नेभाई आदिवासी यांची प्राणज्योत मालवली. त्यानंतर शनिवारी पहाटे राधारानी आदिवासी यांनीही उपचारांना प्रतिसाद न देता अखेरचा श्वास घेतला. या दुर्दैवी घटनेत एकाच कुटुंबातील दोघांचा मृत्यू झाल्याने त्यांच्या मुलांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.या प्रकरणी अंबड पोलिसांनी अपघातग्रस्त कार ताब्यात घेतली असून, संबंधित कार चालकाविरुद्ध निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## महाराष्ट्रातील 27 जिल्ह्यांना यलो अलर्ट; सरी बरसणार

**मुंबई :** वाढत्या उष्णते मध्ये दिलासादायक गोष्ट समोर आली आहे. 28 जून रोजीही राज्यातील 27 जिल्ह्यांना पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. काही भागांत विजांच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यांसह मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

न्सूनने संपूर्ण महाराष्ट्र व्यापल्यानंतर राज्यात पावसासाठी पोषक वातावरण कायम आहे. गेल्या चार दिवसांपासून राज्यातील अनेक भागांत पावसाची संततधार सुरू असून 27 जून रोजीही अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाने हजेरी लावली. दरम्यान, 28 जून रोजीही राज्यातील 27 जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. काही भागांत विजांच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यांसह मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

कोकण विभागातील पालघर, ठाणे आणि मुंबई परिसरात विजांच्या कडकडाटासह तसेच वादळी वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज आहे. या चारही ठिकाणी यलो अलर्ट देण्यात आला आहे. या भागात 30 ते 40 किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातही वादळी वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

पुणे, सातारा, कोल्हापूर आणि घाटमाथा परिसरात विजांच्या कडकडाटासह वादळी वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज आहे. या भागांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला असून 40 ते 50 किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहू शकतात. सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांतही वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता कायम आहे.मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, नांदेड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. या भागांत विजांच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. हिंगोली जिल्ह्यातही काही ठिकाणी वादळी वाऱ्यांसह पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.धुळे, नंदुरबार, जळगाव आणि नाशिक जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.

नाशिक घाटमाथा आणि अहिल्यानगर जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज असल्याने या भागांना यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. विदर्भातील अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मध्यम तर काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. सर्व जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. विजांच्या कडकडाटासह 40 ते 50 किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहण्याचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.राज्यात पुढील काही दिवस पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे. त्यामुळे नागरिकांनी तसेच शेतकऱ्यांनी हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## टीईटी पेपरफुटी प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करा; दोषींवर कठोर कारवाईची अभाविपची मागणी


हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी


**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) अवघ्या काही तासांवर असताना संभाव्य पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर परीक्षा पुढे ढकलावी लागल्याने विद्यार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या घटनेचा निषेध करत अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) ने संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय, निष्पक्ष आणि वेळबद्ध चौकशी करून दोषींवर कठोर फौजदारी कारवाई करण्याची मागणी केली आहे.

अभाविपने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, लाखो विद्यार्थ्यांनी अनेक महिन्यांपासून केलेल्या परिश्रमांवर पाणी फिरले असून, परीक्षा पुढे ढकलल्यामुळे विद्यार्थ्यांचे मानसिक, शैक्षणिक आणि आर्थिक नुकसान झाले आहे. ही घटना केवळ प्रशासकीय अपयश नसून राज्याच्या परीक्षा व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी असल्याचे परिषदेने म्हटले आहे.

निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, गेल्या काही वर्षांत राज्यातील विविध भरती, प्रवेश व पात्रता परीक्षांमध्ये पेपरफुटी आणि गैरप्रकारांची मालिका सुरूच आहे. एमएचटी-सीईटी, आरोग्य विभाग भरती, शिक्षक पात्रता परीक्षा तसेच राष्ट्रीय स्तरावरील विविध परीक्षांमधील गैरप्रकारांमुळे विद्यार्थ्यांचा परीक्षा प्रक्रियेवरील विश्वास डळमळीत झाला आहे. प्रत्येक वेळी चौकशीची घोषणा होत असली तरी अशा घटना पुन्हा घडत असल्याने परीक्षा सुरक्षेतील त्रुटी दूर करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज असल्याचे अभाविपने म्हटले आहे.

परीक्षा प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर सुरक्षितता, गोपनीयता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, डिजिटल ट्रॅकिंग, सायबर सुरक्षा, अधिकाऱ्यांची स्पष्ट जबाबदारी आणि स्वतंत्र देखरेख यंत्रणा उभारण्याची मागणीही परिषदेने केली आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून टीईटी परीक्षेची नवीन तारीख तातडीने जाहीर करावी आणि विद्यार्थ्यांवरील अतिरिक्त आर्थिक व मानसिक भार कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

### "परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास पुन्हा निर्माण करावा"

**अभाविप देवगिरी प्रदेश मंत्री डॉ. वरूणराज नन्नावरे यांनी सांगितले की, महाराष्ट्रात पुन्हा एकदा पेपरफुटीची घटना घडणे हे शिक्षण व्यवस्थेच्या अपयशाचे द्योतक आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित परीक्षा ही शैक्षणिक व्यवस्थेचा पाया असते. त्यामुळे शासनाने केवळ आश्वासने न देता परीक्षा व्यवस्थेत ठोस, परिणामकारक आणि दीर्घकालीन सुधारणा तातडीने राबवाव्यात. अन्यथा विद्यार्थ्यांमधील असंतोष अधिक तीव्र होण्याची शक्यता असल्याचा इशाराही त्यांनी दिला.**

## UPSCची मोठी कारवाई! AI तपासणीत परीक्षेपूर्वीच 600 बनावट अर्ज बाद

**नवी दिल्ली :** केंद्रीय लोकसेवा आयोगाने सिव्हिल सेवा परीक्षा २०२६ अधिक पारदर्शक आणि गैरप्रकारमुक्त करण्यासाठी मोठे पाऊल उचलले आहे. यंदा प्रथमच कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित पडताळणी प्रणालीचा वापर करून परीक्षेपूर्वीच सुमारे ६०० संशयास्पद अर्ज रद्द करण्यात आले. यापूर्वी अनेक गैरप्रकार मुलाखत किंवा अंतिम निवड टप्प्यात उघडकीस येत असत. मात्र, यंदा अर्ज प्रक्रियेच्या सुरुवातीलाच AI च्या मदतीने डुप्लिकेट आणि बनावट अर्जांची ओळख पटवून त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. त्यामुळे प्रामाणिक उमेदवारांसाठी अधिक निष्पक्ष स्पर्धेचा मार्ग मोकळा झाला आहे. UPSCचे अध्यक्ष अजय कुमार यांनी सांगितले की, अर्ज प्राप्त झाल्यानंतर 'डी-डुप्लिकेशन' मोहीम राबवण्यात आली. या प्रक्रियेत प्रत्येक उमेदवाराची खरी ओळख तपासण्यात आली. एकापेक्षा अधिक अर्ज करणारे, चुकीची माहिती देणारे किंवा बनावट ओळख वापरणारे उमेदवार AI प्रणालीद्वारे शोधण्यात आले. यंदा प्रथमच प्राथमिक परीक्षा होण्यापूर्वीच संशयास्पद अर्जांवर कारवाई करण्यात आली. माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या सहकार्याने विकसित करण्यात आलेल्या AI प्रणालीमुळे बनावट उमेदवारांना पुढील टप्प्यापर्यंत पोहोचणे शक्य होणार नाही.

## वादळात शाळेचे छप्पर उडाले; विद्यार्थी उघड्यावर; पावसाळ्यात विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न


### शिक्षण विभागाच्या ढिसाळ कारभारामुळे जोगी तांडा येथील जिल्हा परिषद शाळेची दुरवस्था; ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट


हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी


**परभणी :** तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे वादळी वाऱ्यामुळे मोठे नुकसान झाले असून शाळेचे पूर्ण छप्पर उडून गेले आहे. शाळा सुरू होण्याच्या पूर्वी झालेले हे वादळ एवढे भयानक होते की, या वादळामध्ये शाळेचे छप्पर उडून गेले. आता पाऊस सुरू झाल्यामुळे या सर्व वर्ग खोल्यांमध्ये पावसाचे पाणी साचत आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना बसणे अत्यंत असुरक्षित बनले आहे. शिक्षण खात्याच्या या भोंगळ कारभारामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण उघड्यावर आले असून प्रशासनाचा मोठा दुर्लक्षपणा यातून समोर आला आहे.

पावसाळ्याचा हंगाम सुरू झाल्याने शिक्षणाची ही समस्या अधिकच गंभीर बनली आहे. शिक्षकांसमोर विद्यार्थ्यांना कसे आणि कुठे बसवावे, उघड्यावर कसे शिकवावे किंवा पर्यायी ठिकाणी त्यांच्यावर कसे अध्यापन करावे, असा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. सरकारची गत नेमकी माकडासारखी झाली आहे. जेव्हा पाऊस पडतो तेव्हाच घराची आठवण होते, तसे पावसाळ्यामध्ये तांड्यावरील शाळा किंवा त्या त्या विभागातील शाळा सुरक्षित आहेत का, हे बघण्याची जिम्मेदारी शिक्षण विभागाची आहे. मात्र, शिक्षण विभागाने याकडे पूर्णपणे डोळेझाक केल्यामुळे आता त्यांच्यापुढे मोठे आव्हान उभे राहिले आहे. आधुनिक काळामध्ये आणि एकविसाव्या शतकातही शिक्षणाची ही दुरवस्था असेल, तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शाळेत कसे शिक्षण घ्यावे, असा संतप्त प्रश्न आता पालकांकडून विचारला जात आहे.

या गंभीर परिस्थितीमुळे शाळेची तातडीने दुरुस्ती करून विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित व सुस्थितीत वर्ग खोल्या उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी संपूर्ण गावच्या ग्रामस्थांकडून होत आहे. दरम्यान, शाळेच्या दुरुस्तीसाठी संबंधित विभागाने तातडीने निधी उपलब्ध करून देऊन युद्धपातळीवर काम हाती घ्यावे; अन्यथा विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान झाल्याशिवाय राहणार नाही, अशी भीती समस्त ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे.



### विद्यार्थी उघड्यावर!

**जोगी तांडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे छप्पर वादळात उडून गेल्याने विद्यार्थ्यांचे शिक्षण उघड्यावर आले आहे. वर्ग खोल्यांमध्ये पावसाचे पाणी साचत असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असून शिक्षकांना पर्यायी जागेत अध्यापन करावे लागत आहे. एकविसाव्या शतकातही प्रशासनाच्या डोळेझाक आणि ढिसाळ कारभारामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अशा असुरक्षित वातावरणात शिकावे लागत असल्याने पालकांमध्ये तीव्र संताप आहे. ग्रामस्थांनी या शाळेची युद्धपातळीवर दुरुस्ती करून निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही.**

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# संपादकीय

## काळा बाजार कधी थांबणार?

महाराष्ट्र राज्यातील लाखो सुशिक्षित बेरोजगार तरुण ज्या परीक्षेची वर्षानुवर्षे अत्यंत प्रामाणिकपणे तयारी करत होते, त्या शिक्षक पात्रता परीक्षेला (टीईटी) पुन्हा एकदा पेपरफुटीचे ग्रहण लागल्याची अत्यंत धक्कादायक आणि दुर्दैवी घटना समोर आली आहे. प्रश्नपत्रिका फुटल्याच्या बळकट संशयावरून राज्यभरात एकच खळबळ उडाली असून, या प्रकरणी पोलिसांनी तातडीने मोठी कारवाई करत तिघा संशयित आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. पेपरफुटीचे हे प्राथमिक वृत्त समोर आल्यानंतर महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने अत्यंत घाईघाईने नियोजित परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. वारंवार होणाऱ्या या प्रकारांमुळे राज्यातील परीक्षा पद्धती किती पोखरली गेली आहे आणि कंत्राटदार व दलालांचे रॅकेट किती सक्रिय आहे, हेच पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. मिळालेल्या अत्यंत गुप्त माहितीनुसार, भिवंडीतील कोनगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या एका हॉटेलमध्ये या परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेबाबत अत्यंत संशयास्पद हालचाली आणि आर्थिक देवाणघेवाण सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ त्या ठिकाणी छापा टाकला, मात्र पोलिसांची चाहूल लागताच संशयित आरोपी तेथून पसार होण्यात यशस्वी झाले. यानंतर पोलिसांनी अत्यंत शिताफीने सापळा रचत सहारा एअरपोर्ट परिसरातून तिघांना ताब्यात घेतले. त्यांची प्राथमिक चौकशी केली असता, त्यांच्याकडे या परीक्षेतील मूळ प्रश्न आढळून आल्याचे अत्यंत गंभीर वास्तव समोर आले आहे. या आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, या काळ्या बाजारामागे नक्की कोणाकोणाचे हात आहेत, याचा सखोल तपास आता पोलिसांनी सुरू केला आहे. या संपूर्ण गैरप्रकारामुळे राज्यातील लाखो प्रामाणिक उमेदवारांवर अत्यंत अन्याय झाला आहे. परीक्षा पूर्णपणे निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने व्हावी, या नावाखाली परीक्षा परिषदेने ऐनवेळी परीक्षा पुढे ढकलून आपल्या जबाबदारीतून हात झटकले असले, तरी यामुळे विद्यार्थ्यांचे झालेले मानसिक खच्चीकरण कोण भरून काढणार, हाच मोठा प्रश्न आहे. राज्यातील अनेक शहरांतील हजाराहून अधिक केंद्रांवर ही परीक्षा होणार होती आणि यासाठी सहा लाखांपेक्षा जास्त उमेदवारांनी रात्रीचा दिवस करून नोंदणी केली होती. परीक्षा परिषदेने उमेदवारांना पुन्हा अर्ज करण्याची किंवा शुल्क भरण्याची आवश्यकता नसल्याचे सांगून दोन-तीन दिवसांत नव्या तारखेची घोषणा करण्याचे आश्वासन दिले असले, तरी यामुळे विद्यार्थ्यांचा प्रशासनावरील विश्वास पूर्णपणे उडाला आहे. या दुर्दैवी घटनेनंतर राज्यातील राजकीय वातावरणही कमालीचे तापले असून विरोधी पक्षांनी सरकारवर जोरदार ताशेरे ओढले आहेत. यापूर्वीही अनेक मोठ्या परीक्षांमध्ये अशाच प्रकारे पेपरफुटीच्या घटना घडल्या असून, वारंवार होणाऱ्या या प्रकारांमुळे राज्यातील तरुणांच्या भविष्याशी आणि त्यांच्या स्वप्नांशी क्रूर खेळ खेळला जात असल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे. तरुणांनी केवळ परीक्षा द्यायची, ती फुटली की आंदोलन करायचे आणि पुन्हा तारखेची वाट पाहायची, हेच चक्र राज्यात वर्षानुवर्षे सुरू आहे. केवळ दोन-चार मोहरे अटक करून हे सत्र थांबणार नाही, तर या रॅकेटच्या मुळाशी असलेल्या मुख्य सुत्रधारांवर आणि शिक्षण विभागातील बड्या अधिकाऱ्यांवर जोपर्यंत कठोर कायदेशीर बडगा उगारला जात नाही, तोपर्यंत महाराष्ट्रातील स्पर्धा परीक्षांचा हा चिखल साफ होणार नाही.

# माणसाच्या डोक्यातून जात जात नाही, तोपर्यंत लोकशाही खऱ्या अर्थाने रुजणार नाही!

"लोकशाही केवळ मतदानाचा अधिकार देत नाही; ती प्रत्येक माणसाला समान सन्मानाने जगण्याचा अधिकार देते. पण जर माणसाच्या मनातून जातच जात नसेल, तर लोकशाहीचा आत्माच जखमी होतो." भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून ओळखला जातो. आपल्या संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय यांची हमी दिली आहे. परंतु संविधानाच्या या महान मूल्यांपेक्षा जर समाजात जात, धर्म, पंथ, वर्ण आणि जन्म यांना अधिक महत्त्व दिले जात असेल, तर आपण खऱ्या अर्थाने लोकशाही जगत आहोत का, हा प्रश्न प्रत्येक सुजाण नागरिकाने स्वतःला विचारण्याची गरज आहे.आज विज्ञानाने चंद्रावर झेप घेतली, कृत्रिम बुद्धिमत्तेचे युग आले, जग डिजिटल झाले; पण अनेकांच्या मनात अजूनही जातीच्या भिंती उभ्याच आहेत. शिक्षण वाढले, संपत्ती वाढली, तंत्रज्ञान बदलले; पण विचार बदलले का? हा सर्वात मोठा प्रश्न आहे.जात ही माणसाच्या जन्माची ओळख असू शकते; पण ती त्याच्या माणुसकीची ओळख कधीच असू शकत नाही. दुर्दैवाने आजही अनेक ठिकाणी माणसाचे मूल्य त्याच्या कर्तृत्वावर नव्हे, तर जातीवर ठरवले जाते. नोकरी देताना, घर भाड्याने देताना, विवाह ठरवताना, राजकारण करताना, अगदी मैत्री करतानाही जातीचा विचार केला जातो. ही मानसिकता लोकशाहीच्या मुळावर घाव घालणारी आहे.

भारतीय समाजात अनेक महान समाजसुधारकांनी जातिभेदाविरुद्ध आयुष्यभर संघर्ष केला. महात्मा ज्योतिराव फुले यांनी शिक्षणातून समानतेचा मार्ग दाखवला. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्रिया आणि वंचित समाजासाठी शिक्षणाची दारे खुली केली. राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक न्यायासाठी आरक्षणासारखे क्रांतिकारी निर्णय घेतले. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेत समानता, स्वातंत्र्य आणि बंधुतेची मूल्ये रुजवली. या सर्व महापुरुषांचे स्वप्न जातविरहित,समतामूलक आणि लोकशाही भारताचे होते.परंतु आजही काही ठिकाणी जातीच्या नावावर राजकारण केले जाते. मागासवर्गीय उमेदवाराला जर हरवायचे असेल तर मतदारांमध्ये विष पेरले जाते 'निळा' पाहिजे की 'टिळा' पाहिजे. मतदारांना विकासाच्या प्रश्नांपेक्षा जातीय समीकरणांमध्ये अडकवले जाते. उमेदवाराची गुणवत्ता,प्रामाणिकपणा किंवा कार्यक्षमता न पाहता त्याची जात महत्त्वाची मानली जाते. ही प्रवृत्ती लोकशाहीला कमकुवत करते. कारण अशा वेळी लोकप्रतिनिधी समाजाचा नसून विशिष्ट जातीचा प्रतिनिधी बनतो.

सोशल मीडियाच्या युगातही जातीय द्वेषाचे संदेश, अपमानास्पद टिप्पणी आणि समाजात फूट पाडणारे विचार मोठ्या प्रमाणावर पसरवले जातात. तंत्रज्ञानाचा उपयोग समाज जोडण्यासाठी व्हायला हवा; पण तो जर समाज तोडण्यासाठी वापरला गेला, तर ती अत्यंत धोकादायक बाब आहे. मतदानाचा अधिकार सर्वांना आहे; पण सामाजिक सन्मान सर्वांना आहे का? कायद्यापुढे सर्व समान आहेत; पण समाजाच्या नजरेतही सर्व समान आहेत का? जर उत्तर "नाही" असेल, तर आपली लोकशाही अजूनही अपूर्ण आहे.आज अनेक राजकीय क्षेत्रात, शिक्षण क्षेत्रात, सहकार क्षेत्रात जातीच्या समीकरणांवर निवडणुका लढवतात. उमेदवाराच्या जातीच्या नावावर माणसामाणसांत द्वेष निर्माण केला जातो. समाजाचे तुकडे केले जातात. एकमेकांविषयी संशय आणि वैरभाव निर्माण होतो. बंधुभाव हरवतो. संविधानाने दिलेली "बंधुता" ही केवळ पुस्तकातील संकल्पना राहते. जिथे बंधुता नाही, तिथे लोकशाही कशी टिकणार? भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान लिहिताना स्पष्ट सांगितले होते की, राजकीय लोकशाही टिकवायची असेल, तर सामाजिक लोकशाही आवश्यक आहे. सामाजिक लोकशाही म्हणजे समानतेची भावना, परस्पर आदर आणि बंधुता. पण जर समाजात जातीय श्रेष्ठत्वाची भावना जिवंत राहिली, तर संविधान कितीही महान असले तरी त्याचा आत्मा जिवंत राहू शकत नाही.आपण अनेकदा म्हणतो, "माझी जात श्रेष्ठ आहे." पण कोणतीही जात माणुसकीपेक्षा मोठी असू शकते का? रक्ताचा रंग सर्वांचा लाल असतो. अश्रूंची चव सर्वांची खारट असते. दुःख, वेदना, आनंद आणि प्रेम यांना जात नसते. मग माणसाला जातीच्या चौकटीत का अडकवायचे? आज अनेक तरुण उच्चशिक्षित आहेत; पण सोशल मीडियावर जातीचा अभिमान मिरवताना दिसतात. जातीचे स्टेटस, जातीचे ग्रुप, जातीचे मेळावे, जातीच्या घोषणा हे सर्व पाहिले की प्रश्न पडतो, आपण आधुनिक झालो की फक्त आधुनिक साधने वापरू लागलो? खरी आधुनिकता विचारांत असते, जन्माच्या अभिमानात नाही. जातीय मानसिकतेमुळे कित्येक गुणवान मुलांना संधी मिळत नाही. कित्येक तरुण-तरुणींची प्रेमविवाहाची स्वप्ने मोडली जातात. काहींना तर ऑनर किलिंगसारख्या अमानुष घटनांना सामोरे जावे लागते. कित्येक कुटुंबे सामाजिक बहिष्कार सहन करतात. ही कोणत्या संस्कृतीची ओळख आहे?

शाळा आणि महाविद्यालये ही माणूस घडवण्याची केंद्रे आहेत. तिथे विद्यार्थ्यांना जातीपेक्षा संविधान, स्पर्धेपेक्षा सहकार्य, आणि अहंकारापेक्षा माणुसकी शिकवली गेली पाहिजे. प्रत्येक शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या मनात "मी आधी भारतीय, नंतर इतर काही" हा विचार रुजवला पाहिजे. पालकांचीही तेवढीच मोठी जबाबदारी आहे. जर घरातच मुलांना जातीवरून श्रेष्ठ-कनिष्ठ शिकवले, तर समाज बदलणार कसा? मुलांना माणसाचा आदर करायला शिकवा, जातीचा अभिमान नाही. कारण जात जन्माने मिळते; पण माणुसकी संस्काराने घडते.आज समाजाला जातीच्या राजकारणाची नाही, तर माणुसकीच्या नेतृत्वाची गरज आहे. विकास, शिक्षण, रोजगार, आरोग्य, पर्यावरण, महिला सुरक्षा, विज्ञान, सामाजिक न्याय या विषयांवर चर्चा व्हायला हवी. पण दुर्दैवाने अनेकदा जातीय ध्रुवीकरणाच्या आवाजात हे प्रश्न हरवून जातात.लोकशाही फक्त संसदेत जगत नाही; ती आपल्या घरात, शाळेत, कार्यालयात, आपल्या परिसरात आणि मनात जगते. आपण दुसऱ्या माणसाला समानतेने वागवतो का? त्याच्या जातीचा विचार न करता त्याचा सन्मान करतो का? यावर लोकशाहीचे भवितव्य अवलंबून आहे.

महात्मा गांधी, महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, छत्रपती राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि असंख्य समाजसुधारकांनी जातिभेदाविरुद्ध आयुष्यभर संघर्ष केला. त्यांनी माणुसकीची मशाल पेटवली. त्या मशालीचा प्रकाश पुढे नेणे ही आजच्या पिढीची जबाबदारी आहे.खरी लोकशाही म्हणजे प्रत्येक माणसाला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. कोणाचाही अपमान त्याच्या जातीमुळे होणार नाही, कोणालाही संधीपासून वंचित ठेवले जाणार नाही, प्रत्येकाला समान न्याय मिळेल आणि प्रत्येकजण दुसऱ्याला "माणूस" म्हणून स्वीकारेल तो दिवस म्हणजे लोकशाहीचा खरा उत्सव असेल.आज गरज आहे ती संविधानाचे वाचन करण्यापेक्षा संविधान जगण्याची. कायद्याने जातीय भेदभावाला बंदी घातली आहे; तरी देखील"गावातील चावडी असो, शहरातील उंच इमारती असोत, शाळा असो, कार्यालय असो किंवा राजकारणाचे व्यासपीठ आजही अनेक ठिकाणी माणसाचे मूल्यमापन त्याच्या गुणवत्तेवर नव्हे, तर जातीच्या चष्म्यातून केले जाते. हा चष्मा जोपर्यंत डोळ्यांवर आहे, तोपर्यंत समाजात खरी समता आणि लोकशाहीची खरी संस्कृती रुजणे कठीण जरी असले तरी आता मनातूनही त्या भिंती पाडाव्या लागतील. कारण समाज बदलण्यासाठी कायदे पुरेसे नसतात; त्यासाठी विचार बदलावे लागतात.

चला, आपण सर्वांनी खरोखरच एक संकल्प करायला हवा,कोणत्याही माणसाचा सन्मान त्याच्या जातीवर नव्हे, तर त्याच्या चारित्र्यावर, कर्तृत्वावर आणि माणुसकीवर करायला हवा. आपल्या मुलांना जात नव्हे, तर समानता शिकवायला हवी. मत देताना जात नव्हे, तर विकास पाहिला पाहिजे. नाती जोडताना जन्म नव्हे, तर माणुसकी पाहिली पाहिजे.कारण एक गोष्ट कायम लक्षात ठेवली पाहिजे "जोपर्यंत माणसाच्या डोक्यातून जात जात नाही, तोपर्यंत लोकशाही खऱ्या अर्थाने रुजणार नाही. आणि ज्या दिवशी जातीच्या भिंती कोसळतील, त्या दिवशी संविधानातील समानता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता ही चारही मूल्ये प्रत्येक भारतीयाच्या जीवनात खऱ्या अर्थाने फुलतील. तोच दिवस भारताच्या लोकशाहीचा खरा विजय असेल."

**लेखक -**
**समाजभूषण रामदास वच्छालामाई रखमाजी वाघमारे, छत्रपती संभाजीनगर**
**मो.नं.8888125610**

# राज्यसभा खासदार रामरावजी वडकुते यांना सामाजिक कार्यासाठी मानद डॉक्टरेट प्रदान

हिंगोली/गोपाल सातपुते

हिंगोली | समाजातील वंचित, दुर्बल, शेतकरी, मेंढपाळ, भटक्या-विमुक्त, ओबीसी तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक दशकांपासून सातत्याने केलेल्या निःस्वार्थ सामाजिक कार्याची दखल घेत राज्यसभा खासदार रामराव सखाराम वडकुते यांना Bharath Virtual University for Peace and Education यांच्या वतीने "Honorary Doctorate in Social Service" (मानद डॉक्टरेट – सामाजिक सेवा) हा प्रतिष्ठेचा सन्मान बेंगळुरू येथे आयोजित विशेष दीक्षांत समारंभात प्रदान करण्यात आला.

मा. रामराव वडकुते यांचे सार्वजनिक जीवन हे समाजसेवा, लोककल्याण आणि विकासाभिमुख नेतृत्वासाठी ओळखले जाते. ग्रामीण भागातील शेतकरी, पशुपालक, धनगर समाज, ओबीसी, महिला, युवक आणि विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांसाठी त्यांनी सातत्याने संघर्ष करून शासनाच्या विविध स्तरांवर प्रभावी पाठपुरावा केला आहे. सामाजिक न्याय, शिक्षण, रोजगार, पाणी, सिंचन, ग्रामीण विकास आणि वंचित घटकांच्या सक्षमीकरणासाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांना हा राष्ट्रीय सन्मान बहाल करण्यात आला.



मा. वडकुते यांनी महाराष्ट्र राज्य शेळी व मेंढी विकास महामंडळाचे अध्यक्ष म्हणून पशुपालक आणि मेंढपाळ समाजाच्या विकासासाठी अनेक उपक्रम राबविले. त्यानंतर महाराष्ट्र विधान परिषदेचे आमदार म्हणून त्यांनी शेतकरी, धनगर समाज, ओबीसी, शिक्षण, सिंचन, पाणीटंचाई, ग्रामीण विकास, सामाजिक न्याय आणि रोजगाराशी संबंधित अनेक महत्त्वाचे प्रश्न विधान परिषदेत प्रभावीपणे मांडले. सध्या ते राज्यसभेचे खासदार म्हणून महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत असून जनहिताच्या विषयांवर सक्रियपणे कार्यरत आहेत.

Bharath Virtual University for Peace and Education ही संस्था शांतता, शिक्षण, मानवतावादी मूल्ये, सामाजिक विकास आणि सार्वजनिक जीवनातील उल्लेखनीय योगदानाचा गौरव करण्यासाठी मानद डॉक्टरेटसह विविध राष्ट्रीय सन्मान प्रदान करत असल्याचे संस्थेकडून नमूद करण्यात आले आहे. यापूर्वीही सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय, उद्योग, सार्वजनिक जीवन आणि राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांना या संस्थेने मानद डॉक्टरेट प्रदान केली आहे. बेंगळुरू येथे झालेल्या या समारंभात देशातील विविध राज्यांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षणतज्ज्ञ आणि विविध क्षेत्रातील प्रतिनिधी उपस्थित होते. या प्रसंगी मा. रामराव वडकुते यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

या सन्मानाबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना मा. रामराव वडकुते म्हणाले, "हा सन्मान माझा नसून समाजासाठी अहोरात्र कार्य करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याचा आहे. या गौरवामुळे समाजाप्रती माझी जबाबदारी अधिक वाढली असून, भविष्यातही जनसेवा, सामाजिक न्याय आणि राष्ट्रहितासाठी अधिक जोमाने कार्य करत राहीन."

या सन्मानाबद्दल महाराष्ट्रासह विशेषतः मराठवाड्यातील विविध सामाजिक संस्था, लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी मा. रामराव वडकुते यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# महाराष्ट्राच्या वनहद्दीत पाच वर्षांत साडेतीन लाख झाडांवर कुऱ्हाड

## सव्वा लाख झाडे सागवानाची; बेकायदेशीर वृक्षतोड रोखण्याचे मोठे आव्हान

**मुंबई :** निसर्गसंपन्न महाराष्ट्राच्या वनक्षेत्राला बेकायदेशीर वृक्षतोड आणि लाकूड तस्करांच्या टोळ्यांनी पुरते पोखरल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. गेल्या पाच वर्षांत राज्याच्या वनहद्दीतील तब्बल साडेतीन लाखांहून अधिक झाडांवर कुऱ्हाड चालवण्यात आली असून, यामध्ये सव्वा लाख मौल्यवान सागवान वृक्षांचा बळी गेला आहे. यामुळे शासनाचे ३० कोटी रुपयांपेक्षा जास्त नुकसान झाले असून, राज्याच्या वनवैभवाचे रक्षण करण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर उभे ठाकले आहे.

विधिमंडळात उपस्थित झालेल्या तारांकित प्रश्नाला वनमंत्री गणेश नाईक (Ganesh Naik) यांनी छापील उत्तर दिले, त्यातून ही माहिती समोर आली आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती तालुक्यातील शेनगाव वनउपक्षेत्रातून शेजारच्या तेलंगणा राज्यात सागवानाची तस्करी झाल्याचे वनमंत्र्यांनी मान्य केले. या प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुणे जिल्ह्यातील जुन्नर वनविभागांतर्गत काठापूर बुद्रुक आणि शिंगवे या गावांच्या वनक्षेत्रात अतिशय औषधी अशा 'खैर' प्रजातीच्या ६१ झाडांची (61 trees) कत्तल झाल्याचे उघड झाले असून या प्रकरणी वनगुन्हे दाखल करण्यात आले आहेत. जळगावच्या यावल वनविभागातील पाडळसा शिवारात मालकी हक्काच्या ३० झाडांची अवैध तोड झाली, तर नाशिकच्या पेठ वनपरिक्षेत्रात अवैध वृक्षतोडीचे ४ गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.

'टास्क फोर्स' तैनात असतानाही वृक्षतोड

सिंधुदुर्गमधील इको सेन्सिटिव्ह गावांच्या संरक्षणासाठी टास्क फोर्स असतानाही वन कर्मचाऱ्यांच्या संगनमतामुळे वृक्षतोड सुरू असल्याचा आरोप या तारांकित प्रश्नात करण्यात आला. मात्र वनमंत्र्यांनी त्याचा इन्कार केला.त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये सावंतवाडी-दोडामार्ग कॉरिडॉरचे संरक्षण करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्स कार्यरत आहे. या टास्क फोर्सकडे प्राप्त तक्रारींच्या आधारे आतापर्यंत २ लाख ९१ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.तोडण्यात आलेल्या झाडांच्या बदल्यात आतापर्यंत ८२० वृक्षांची पुनर्लागवड करण्यात आली असून, प्रलंबित राहिलेल्या १३ प्रकरणांमधील वृक्षांची पुनर्लागवड चालू २०२६ च्याच पावसाळ्यात पूर्ण करण्यात येईल, असे आश्वासन वनमंत्री गणेश नाईक यांनी दिले आहे.

# ग्रामीण पोलिसांचा अवैध शस्त्र तस्करांवर मोठा प्रहार; 10 दिवसांत आंतरजिल्हा साखळीचा भंडाफोड

## 8 गावठी कट्टे, 14 जिवंत काडतुसे जप्त; 10 आरोपी जेरबंद, जिल्ह्याबाहेरील शस्त्रपुरवठा करणारे डीलरही पोलिसांच्या जाळ्यात









**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यात अवैध अग्निशस्त्रांची तस्करी करून गुन्हेगारीला खतपाणी घालणाऱ्या आंतरजिल्हा टोळीविरुद्ध छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांनी मोठी कारवाई करत अवघ्या दहा दिवसांत शस्त्रतस्करीची साखळी उद्ध्वस्त केली आहे. या कारवाईत ८ गावठी कट्टे, १४ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली असून १० आरोपींना अटक करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, शस्त्रे बाळगणाऱ्या आरोपींपासून थेट जिल्ह्याबाहेरील पुरवठादार आणि डीलरपर्यंत पोहोचत पोलिसांनी संपूर्ण रॅकेट उघडकीस आणले आहे.

पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांनी जिल्ह्यातील अवैध शस्त्रधारक, शस्त्रांची खरेदी-विक्री करणारे तसेच दहशत निर्माण करणाऱ्या गुन्हेगारांविरुद्ध कठोर कारवाईचे आदेश दिले होते. त्यानुसार १३ ते २२ जून या कालावधीत स्थानिक गुन्हे शाखा आणि बिडकीन पोलिसांनी संयुक्तपणे विविध ठिकाणी छापेमारी करून ही कारवाई केली.

सर्वात मोठी कारवाई बिडकीन परिसरात करण्यात आली. सुरुवातीला गणेश शिवाजी उघडे याच्याकडून एक गावठी कट्टा आणि पाच जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. त्यानंतर तपासाची व्याप्ती वाढवत पोलिसांनी अजय उर्फ रोमन शिंदे, राष्ट्रपाल तुपे, आकाश इंगळे, संतोष गायकवाड आणि निशांत पन्हाळे या डीलर व साथीदारांना अटक केली. या संपूर्ण तपासात एकूण चार गावठी कट्टे आणि आठ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली.

याशिवाय गंगापूर हद्दीत किशोर शिवनाथ जाधव याच्याकडून एक गावठी कट्टा व एक जिवंत काडतूस जप्त करण्यात आले. बिडकीन पोलिसांनी पुढील कारवाईत आकाश निकम व लखन राठोड यांच्याकडून दोन गावठी कट्टे आणि चार जिवंत काडतुसे जप्त केली. तर अजिंठा परिसरात आबासाहेब मिसाळ याच्याकडून एक गावठी कट्टा आणि एक जिवंत काडतूस हस्तगत करण्यात आले.

या सर्व आरोपींविरुद्ध भारतीय हत्यार कायदा, १९५९ मधील विविध कलमांनुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे जिल्ह्यात अवैध शस्त्रपुरवठा करणाऱ्या टोळीची साखळी खंडित करण्यात यश आले असून भविष्यात घडू शकणारे गंभीर गुन्हे रोखण्यास मदत होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव म्हणाले, "जिल्ह्यात अवैध शस्त्रे बाळगणारे, त्यांची खरेदी-विक्री करणारे आणि त्याद्वारे दहशत निर्माण करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही कठोर व सातत्यपूर्ण कारवाई सुरू राहणार आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे ही जिल्हा पोलिसांची सर्वोच्च प्राथमिकता असून कायदा हातात घेणाऱ्यांची कोणतीही गय केली जाणार नाही."

ही कारवाई पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विजयसिंग राजपूत, बिडकीनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके तसेच स्थानिक गुन्हे शाखा व बिडकीन पोलिसांच्या पथकाने संयुक्तरीत्या केली.

# फर्दापूर जिल्हा परिषद गटात एकाच वेळी 77 डीपींना मंजुरी; मंत्री अतुल सावे व मेघना बोर्डीकर राव साहेब दानवे यांच्या हस्ते होणार भव्य शुभारंभ

**फर्दापूर :** सोयगाव तालुक्यातील फर्दापूर येथील इद्रीस मुलतानी यांच्या पाठपुराव्याला मोठे यश; १८ गावांतील सुमारे ४ हजार शेतकऱ्यांना मिळणार दिलासा

फर्दापूर जिल्हा परिषद गटातील शेतकरी, नागरिक आणि वीज ग्राहकांसाठी अत्यंत आनंदाची व दिलासादायक बातमी समोर आली आहे. भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रीस मुलतानी यांनी फर्दापूर जिल्हा परिषद गटातील वीज समस्यांबाबत सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला अखेर मोठे यश मिळाले असून गटातील १८ गावांसाठी तब्बल ७७ नवीन डीपी (रोहित्रे) मंजूर करण्यात आले आहेत. विशेष म्हणजे एका जिल्हा परिषद गटात एकाच वेळी एवढ्या मोठ्या प्रमाणात डीपींना मंजुरी मिळण्याची ही दुर्मिळ घटना मानली जात असून यामुळे परिसरातील वीज वितरण व्यवस्थेत मोठी सुधारणा होणार आहे.

फर्दापूर जिल्हा परिषद गटाच्या विविध विकासकामांसंदर्भात मुंबई येथील मंत्रालयात दिनांक ७ एप्रिल २०२६ रोजी ऊर्जा, पाणीपुरवठा व आरोग्य राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक पार पडली होती. या बैठकीस ऊर्जा विभाग, पाणीपुरवठा विभाग तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी व सचिव उपस्थित होते. बैठकीदरम्यान इद्रीस मुलतानी यांनी फर्दापूर जिल्हा परिषद गटातील गावांमध्ये वारंवार उद्भवणाऱ्या वीज समस्यांचा विषय अत्यंत प्रभावीपणे मांडला.

गटातील अनेक गावांमध्ये विद्यमान डीपींवर क्षमतेपेक्षा अधिक भार पडत असल्याने रोहित्रे वारंवार जळत होती. परिणामी शेतकऱ्यांच्या शेतीपंपांचा वीजपुरवठा खंडित होत होता. अनेक दिवस वीजपुरवठा बंद राहत असल्यामुळे पिकांना पाणी देण्यात अडचणी निर्माण होत होत्या. शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत होता तसेच नागरिकांनाही वारंवार वीज खंडित होण्याचा त्रास सहन करावा लागत होता. या सर्व समस्या बैठकीत मांडल्यानंतर ऊर्जा राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांनी तात्काळ दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना ओव्हरलोड डीपींचे सर्वेक्षण करून आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

त्यानुसार ऊर्जा विभाग व महावितरणच्या अधिकाऱ्यांनी फर्दापूर जिल्हा परिषद गटातील गावांमध्ये प्रत्यक्ष पाहणी व सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणामध्ये अनेक डीपी क्षमतेपेक्षा जास्त भार सहन करत असल्याचे आढळून आले. त्यानंतर निरंतर



योजनेअंतर्गत ओव्हरलोड डीपींच्या शेजारी नवीन डीपी बसविणे तसेच ६३ केव्हीए क्षमतेच्या डीपींच्या जागी १०० केव्हीए क्षमतेच्या डीपी बसविण्यास मंजुरी देण्यात आली.

या निर्णयामुळे फर्दापूर जिल्हा परिषद गटातील १८ गावांमध्ये एकाच वेळी ७७ डीपी बसविण्यात येणार आहेत. या कामामुळे सुमारे ४ हजार शेतकऱ्यांना थेट लाभ होणार असून शेतीपंपांना अधिक सक्षम व नियमित वीजपुरवठा उपलब्ध होईल. वीज खंडित होण्याचे प्रमाण कमी होईल, डीपी जळण्याच्या घटना घटतील आणि ग्रामीण भागातील वीज व्यवस्था अधिक मजबूत होण्यास मदत मिळेल. कृषी क्षेत्राबरोबरच घरगुती व व्यावसायिक वीज ग्राहकांनाही या निर्णयाचा मोठा फायदा होणार आहे.

फर्दापूर जिल्हा परिषद गटाच्या विकासासाठी सातत्याने शासन स्तरावर पाठपुरावा करणारे इद्रीस मुलतानी यांच्या प्रयत्नांना मिळालेले हे महत्त्वपूर्ण यश मानले जात आहे. गटातील नागरिक, शेतकरी आणि विविध सामाजिक संघटनांनी या निर्णयाचे स्वागत केले असून विकासकामांसाठी इद्रीस मुलतानी यांची असलेली बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित झाल्याची भावना व्यक्त होत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या समस्येवर आता कायमस्वरूपी तोडगा निघण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलले गेले आहे.

या सर्व ७७ डीपींचा शुभारंभ येत्या शुक्रवारी फर्दापूर येथून मोठ्या उत्साहात व मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याचे पारंपरिक व इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, ऊर्जा राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर, माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे, आमदार सुहास शिरसाट, जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे, जिल्हाध्यक्ष संजय खांबायते, जितेंद्र जयस्वाल, सचिन गरड, जयश्री पवार, अनिता मोठे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

**गावनिहाय मंजूर डीपींची संख्या पुढीलप्रमाणे आहे :**

पळासखेडा (महानोर) – १४

फर्दापूर तांडा – ९,वरखेडी बु. – ४,वरखेडी खु. – ३,जवळा – ४,रवळा – ५,ठाणा – २,पिंपळा – १,धनवट – ५,सावळदबारा-६ढाबा-२,महालब्दा / पिंपळवाडी – २देव्हारी – ३जामठी – १,चारू – १,घाणेगाव – ४,मोलखेडा – ५,नांदा – ५ अशा प्रकारे एकूण ७७ डीपींना मंजुरी देण्यात आली आहे. यापैकी २५ डीपी सिल्लोड महावितरण कार्यालयात उपलब्ध झाल्या असून उर्वरित डीपीदेखील लवकरच उपलब्ध होणार असल्याची माहिती इद्रीस मुलतानी यांनी दिली. मंजूर झालेल्या सर्व डीपींची कामे टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यात येणार असून त्यानंतर संबंधित गावांमधील वीजपुरवठा अधिक सक्षम आणि सुरळीत होणार आहे.

फर्दापूर जिल्हा परिषद गटाच्या इतिहासात विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या या निर्णयामुळे ग्रामीण भागातील वीज व्यवस्थेला नवे बळ मिळणार असून शेतकरी, नागरिक आणि सर्वसामान्य वीज ग्राहकांसाठी हा निर्णय अत्यंत लाभदायक ठरणार आहे. विकासकामांसाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या इद्रीस मुलतानी यांच्या पाठपुराव्यामुळे हा महत्त्वाकांक्षी उपक्रम प्रत्यक्षात साकार होत असल्याने परिसरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी गोदावरी कनिष्ठ महाविद्यालय आणि निर्माण फाउंडेशनची भागीदारी



**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी :** विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासाला चालना देत त्यांना रोजगाराभिमुख शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी गोदावरी कनिष्ठ महाविद्यालय, हडको, छत्रपती संभाजीनगर (कला, विज्ञान, एच.एस.सी. व्होकेशनल व नर्सिंग विभाग) आणि इन्फोसिस-निर्माण फाउंडेशन यांच्यामध्ये सामंजस्य करार (MoU) संपन्न झाला. किसान शिक्षण प्रसारक मंडळ, बोरगाव काळेचे सचिव तथा मराठवाड्याचे शिक्षक आमदार मा. विक्रमजी काळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा करार करण्यात आला. महाविद्यालयाच्या प्राचार्या शुभांगीताई शिवाजीराव सूर्यवंशी आणि निर्माण फाउंडेशनचे सेंटर मॅनेजर इरफान खान यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करून भागीदारीला औपचारिक स्वरूप दिले. कार्यक्रमाची सुरुवात उत्साहपूर्ण वातावरणात झाली. यावेळी महाविद्यालयाच्या वतीने निर्माण फाउंडेशनच्या प्रतिनिधींचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. तसेच शाल व पुष्पगुच्छ प्रदान करून त्यांचा सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी एच.एस.सी. व्होकेशनल विभाग प्रमुख प्रशांत दंदे, कला विभाग प्रमुख हरिदास सोमवंशी, विज्ञान विभाग प्रमुख डॉ. सुनील शेरखाने, नर्सिंग विभाग प्रमुख नितीन कवडे, विद्या शेरकर, प्रल्हाद जाधव, प्रदीप डोणगावे, झाकीर शेख, दिलीप बोर्डे, विवेक तेरकर, मीना नागे, महादेव मुंढे, कृष्णा भोयरेकर, प्रविण लोहार तसेच महाविद्यालयातील शिक्षक व कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

निर्माण फाउंडेशनतर्फे सेंटर मॅनेजर इरफान खान, प्लेसमेंट मॅनेजर विशाल म्हस्के आणि सॉफ्ट स्किल्स प्रशिक्षक विकास उक्कलकर यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

या सामंजस्य करारामुळे विद्यार्थ्यांना कौशल्य विकास प्रशिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास, करिअर मार्गदर्शन, रोजगाराभिमुख प्रशिक्षण, उद्योग क्षेत्राशी संपर्क तसेच प्लेसमेंटच्या संधी उपलब्ध होणार आहेत. शिक्षण, कौशल्य आणि रोजगार यांचा प्रभावी सेतू निर्माण करून विद्यार्थ्यांचे भविष्य अधिक सक्षम करण्याचा दोन्ही संस्थांचा सामायिक उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

भविष्यात विविध शैक्षणिक, कौशल्यवर्धन आणि रोजगाराभिमुख उपक्रमांच्या माध्यमातून ही भागीदारी अधिक परिणामकारक ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## आज जिल्हाभर राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम

### शून्य ते पाच वर्षांच्या प्रत्येक बालकापर्यंत दोन थेंब पोहोचविण्यासाठी आरोग्य यंत्रणा सज्ज

**छत्रपती संभाजीनगर :** पोलिओमुक्त भारताचा दर्जा कायम राखण्यासाठी रविवारी (दि. २८ जून) छत्रपती संभाजीनगर जिल्हाभर राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येणार असून, शून्य ते पाच वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजण्यासाठी आरोग्य विभागाने सर्वंकष तयारी पूर्ण केली आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील सर्व आरोग्य यंत्रणा मोहिमेच्या अंमलबजावणीसाठी सज्ज झाली असून, 'एकही बालक लसीकरणापासून वंचित राहणार नाही,' हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून नियोजन करण्यात आले आहे.



जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, ग्रामीण रुग्णालये, जिल्हा रुग्णालय, घाटी रुग्णालय, महानगरपालिका कार्यक्षेत्रातील आरोग्य संस्था, स्वयंसेवी संस्था तसेच खासगी रुग्णालयांमध्ये मोहिमेपूर्व आवश्यक तयारी पूर्ण करण्यात आली आहे. लसींची सुरक्षित साठवणूक आणि वाहतुकीसाठी कोल्ड चेन व्यवस्था, व्हॅक्सीन कॅरिअर्स, आवश्यक औषधे, पोलिओ बूथसाठी लागणारे साहित्य, चेकलिस्ट, बॅनर्स आणि पोस्टर्सची उपलब्धता सुनिश्चित करण्यात आली आहे.

मोहिमेच्या यशासाठी गेल्या काही दिवसांपासून जिल्हाभर व्यापक जनजागृती करण्यात आली आहे. आशा स्वयंसेविकांनी घरभेटी देऊन लाभार्थी कुटुंबांना माहितीपत्रके व स्लिपचे वितरण केले. शाळांमध्ये प्रभात फेऱ्या काढण्यात आल्या, ऑटो व घंटागाड्यांद्वारे ध्वनीप्रसार करण्यात आला, तर मशिदी, मंदिरे, रेल्वे स्थानके, बसस्थानके आणि इतर सार्वजनिक ठिकाणीही नागरिकांना पोलिओ लसीकरणाबाबत जागरूक करण्यात आले.

यंदाच्या मोहिमेत वाड्या-वस्त्या, झोपडपट्ट्या, वीटभट्ट्या, बांधकामस्थळे, स्थलांतरित मजुरांच्या वस्त्या तसेच दुर्गम भागातील बालकांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. या भागांमध्ये विशेष मोबाईल व ट्रान्झिट पथके कार्यरत राहणार असून, प्रत्येक पात्र बालकापर्यंत पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पोहोचविण्यासाठी स्वतंत्र नियोजन करण्यात आले आहे.

## संकटग्रस्त बळीराजाच्या वारसांना शासनाचा मदतीचा हात; शिक्षण, आरोग्य अन् रोजगारासाठी विशेष मोहीम



**पैठण प्रतिनिधी :** शेतकरी आत्महत्यांसारख्या अत्यंत संवेदनशील आणि गंभीर समस्येवर केवळ कोरडी सहानुभूती न दाखवता, अशा संकटग्रस्त शेतकरी कुटुंबांना तातडीने मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रशासकीय पातळीवर युद्धपातळीवर प्रयत्न सुरू झाले आहेत. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील सदस्यांना शिक्षण, हक्काचा रोजगार आणि दर्जेदार आरोग्य सुविधा मिळवून देण्यासाठी शासनाच्या सर्वच कल्याणकारी विभागांनी परस्परांशी समन्वय ठेवून काम करावे, असे स्पष्ट आदेश वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंढे पाटील यांनी दिले आहेत. पैठण तहसील कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या एका विशेष आढावा बैठकीत ते बोलत होते. या मोहिमेमुळे ग्रामीण भागातील अत्यंत गरजू आणि अल्पभूधारक शेतकरी कुटुंबांना मोठा दिलासा मिळण्याची चिन्हे आहेत.

या महत्त्वपूर्ण बैठकीला पैठण-फुलंब्री विभागाच्या उपविभागीय अधिकारी नीलम बाफना, पैठणच्या तहसीलदार ज्योती पवार, गटविकास अधिकारी श्रीमती मनोरमा गायकवाड, नगरपालिकेच्या मुख्याधिकारी श्रीमती अंभोरे आणि तालुका कृषी अधिकारी विकास पाटील यांच्यासह पोलीस दल आणि विविध संबंधित शासकीय विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. बैठकीदरम्यान प्राधान्याने अल्पभूधारक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बळ शेतकऱ्यांच्या सद्यस्थितीवर सखोल चर्चा करण्यात आली. एक हेक्टरपेक्षा कमी शेती असलेल्या कुटुंबांमध्ये आत्महत्येचे प्रमाण चिंताजनक असल्याचे निरीक्षण या वेळी नोंदवण्यात आले. यावर मात करण्यासाठी केवळ कागदी घोडे न नाचवता, प्रत्येक विभागाच्या अधिकाऱ्याने थेट अशा कुटुंबांच्या दारापर्यंत जाऊन शासनाच्या विविध विमा व अर्थसहाय्य योजनांचा लाभ सक्रियपणे पोहोचवावा, असे निर्देश या वेळी देण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने स्वर्गीय गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेची व्यापक जनजागृती करण्याचे आणि कृषी विभागाच्या 'डीबीटी' (थेट लाभ हस्तांतरण) योजनेची माहिती प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोहोचवण्याचे आदेश कृषी विभागाला देण्यात आले आहेत.

या पुनर्वसन मोहिमेत आरोग्य, शिक्षण आणि पशुसंवर्धन या तीन विभागांवर अत्यंत मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे. आरोग्य विभागाने केवळ केंद्रावर न थांबता, थेट बाधित शेतकरी कुटुंबांना प्रत्यक्ष भेटी देऊन त्यांना विनामूल्य वैद्यकीय सेवा उपलब्ध करून द्याव्यात, तसेच मोठ्या उपचारांसाठी धर्मादाय (चॅरिटेबल) रुग्णालयांचे मार्गदर्शन करावे, अशा सूचना हेलोंढे पाटील यांनी दिल्या. दुसरीकडे, कुटुंबातील शून्य ते अठरा वयोगटातील मुलांच्या सुरक्षित भविष्याचा आणि शिक्षणाचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांना 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले योजने'चा लाभ तात्काळ सुनिश्चित करण्याचे आदेश शिक्षण विभागाला देण्यात आले आहेत.

## सरकारच्या तिजोरीत वक्फ बोर्डाचे 500 कोटी पडून; फडणवीस-शिंदेंची भेट घेणार, चेअरमन समीर काझींची घोषणा

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी :** रस्ते विकास आणि विविध शासकीय कामांसाठी संपादित झालेल्या वक्फ मालमत्तांचा ५०० कोटी रुपयांहून अधिकचा निधी सध्या सरकारच्या तिजोरीत जमा असून, हा हक्काचा निधी परत मिळवण्यासाठी राज्य शासनाकडे जोरदार पाठपुरावा सुरू करण्यात आला आहे. हा निधी वक्फ बोर्डाला मिळाल्यास राज्यात विविध समाजोपयोगी उपक्रम राबवणे शक्य होणार असून, यासाठी लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची शिष्टमंडळासह भेट घेतली जाईल, अशी मोठी घोषणा महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे अध्यक्ष समीर काझी यांनी केली आहे.

शहरातील हज हाऊस येथे आयोजित मंडळाच्या महत्त्वपूर्ण बैठकीनंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. राज्य सरकारकडून दरवर्षी १५ कोटी रुपयांचा विकासनिधी मिळवणारे हे देशातील पहिलेच वक्फ बोर्ड ठरले असून, आता मंडळाचे कामकाज अधिक गतिमान आणि पारदर्शक करण्यासाठी व्यापक पावले उचलली जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हज हाऊस येथे चेअरमन समीर काझी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीत एकूण २१ प्रकरणांपैकी १० प्रकरणांचा जागेवरच निपटारा करण्यात आला. या वेळी बोलताना काझी यांनी बोर्डाच्या कार्यालय स्थलांतराबाबत सुरू असलेल्या वादावर महत्त्वपूर्ण भाष्य केले. पनचक्की येथील मुख्य कार्यालयात जागा कमी पडत असल्याने आणि महत्त्वाच्या फाईल्स व कागदपत्रे सुरक्षित ठेवण्यासाठी काही विभाग तात्पुरत्या स्वरूपात हज हाऊस येथील १५ खोल्यांमध्ये हलवण्यात आले होते. मात्र, एमआयएमसह काही राजकीय आणि सामाजिक संघटनांनी याला तीव्र विरोध दर्शवला आहे. त्यामुळे आता मुख्य कार्यालय आमखास मैदाना जवळील स्मार्ट सिटी कार्यालय किंवा छावणी येथील जलजीवन मिशनचे कार्यालय (ज्या जागा वक्फच्याच मालमत्तेवर बांधलेल्या आहेत) येथे स्थलांतरित करण्यासाठी आगामी काळात ठराव घेण्यात येणार आहे. जर हे शक्य झाले नाही, तर भाडेतत्त्वावर मोठी जागा घेऊन कार्यालय तेथे नेण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

बोर्डाचे कामकाज तांत्रिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आणि न्यायालयात प्रलंबित असलेली प्रकरणे वेगाने निकाली काढण्यासाठी लिगल टीम मजबूत करण्यावर भर दिला जात आहे. यासाठी उच्च न्यायालयाच्या दोन सेवानिवृत्त न्यायाधीशांची नियुक्ती केली जाणार असून, त्यासाठी जाहिरातही प्रसिद्ध करण्यात आली आहे; मात्र आतापर्यंत केवळ एकच अर्ज आल्याने आणखी न्यायाधीशांची आवश्यकता असल्याचे काझी यांनी सांगितले. वकिलांच्या पॅनेलसाठी मात्र समाधानकारक अर्ज आले आहेत.

याच वेळी त्यांनी एका योजनेबाबत खंत व्यक्त करताना सांगितले की, विधवा, परितक्त्या आणि गरजू कुटुंबांतील जी मुले पीएचडी करत आहेत, अशा विद्यार्थ्यांना आर्थिक साहाय्य देण्याची विशेष योजना बोर्डाने सुरू केली आहे. मात्र, दुर्दैवाने या योजनेला अपेक्षेप्रमाणे प्रतिसाद मिळाला नसून आतापर्यंत केवळ पाचच विद्यार्थ्यांनी यासाठी अर्ज दाखल केले आहेत. या बैठकीस मंडळाचे अध्यक्ष समीर काझी यांच्यासह सदस्य एम. यु. पठाण, ॲड. इफ्तेखार हाश्मी, हसनैन शाकेर, मुख्य कार्यकारी अधिकारी फैयाज खान, विशेष अधीक्षक खुसरो खान आणि आस्थापना विभाग प्रमुख शोएब शेख यांची प्रमुख उपस्थिती होती.

## दिवंगत सुरेखाताई भोळे यांच्या स्मृतिदिनानिमित्त सम्राट अशोक प्राथमिक शाळेत फळ वाटप




**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** संत कबीर मानवता संगोपन केंद्र शिक्षण संस्थेच्या वतीने दिवंगत सुरेखाताई मधुकरराव भोळे यांच्या १५ व्या स्मृतिदिनानिमित्त आज, दिनांक २७ जून २०२६ रोजी भव्य फळ वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम संस्थेअंतर्गत संचालित सम्राट अशोक प्राथमिक शाळा, ब्रिजवाडी येथे उत्साहात पार पडला.

स्मृतिदिनाचे औचित्य साधून शाळेतील विद्यार्थ्यांना सकस आहाराचे महत्त्व पटावे या उद्देशाने फळांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी दिवंगत सुरेखाताई भोळे यांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले.

या कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत देशमुख, पर्यवेक्षक किरण भोळे, ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती शोभा नवल, सहशिक्षिका श्रीमती अस्मिता देशमुख, श्रीमती प्रीती जाधव तसेच शिवाजी शिरसाठ प्रामुख्याने उपस्थित होते. याशिवाय परिसरातील प्रतिष्ठित नागरिक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन आणि संयोजन विद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी उत्तमरित्या केले.

## अजिंठा अप्पर तहसील कार्यालय' ची मंजुरी, अजिंठा तालुका साठी 2007 पासून लढा सुरु

### 59 गावे अन् 13 तलाठी सज्जांचा समावेश असणार 1 कोटी 45 लाखांचा निधी जमा; इमारतीसाठी जागा निश्चित; मंत्र्यांनी सूचना दिल्या

हिंदू प्रकाशवार्ता : सय्यद जमीरोद्दीन

**अजींठा प्रतिनिधी :** अजिंठा गावाला तालुक्याचा दर्जा मिळावा, या मागणीसाठी गेल्या दोन दशकांपासून सुरू असलेल्या लढ्याला मोठे यश आले आहे. शासनाने अजिंठा येथे 'अप्पर तहसील कार्यालय' सुरू करण्यासाठी २४ जून रोजी जाहीर सूचना प्रसिद्ध केली आहे. यामुळे सिल्लोड तालुक्यातील ५ महसूल मंडळे आता अजिंठा अप्पर तहसील कार्यालयास जोडली जाणार असून, सिल्लोड तहसीलचा प्रशासकीय भार कमी होणार आहे, अशी माहिती उपविभागीय अधिकारी निलेश अपार यांनी दिली.

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही संबंधित बैठकीत कार्यालयीन इमारतीच्या बांधकामाची प्रक्रिया तात्काळ सुरू करण्याचे निर्देश दिले. सरकारच्या मंजुरीनंतर परिसरात आनंदाचे वातावरण आहे.




सिल्लोड तालुक्यातील एकूण ११ महसूल मंडळांपैकी अजिंठा, शिवना, अंभई, उंडणगाव आणि गोळेगाव बुद्रुक ही ५ मंडळे सिल्लोड तहसील कार्यक्षेत्रातून वगळून नवीन अजिंठा अप्पर तहसील कार्यालयाला जोडली जातील. या अजिंठा अप्पर तहसीलचा नकाशा. विभाजनानंतर सिल्लोड तहसीलच्या कार्यक्षेत्रात सिल्लोड, निल्लोड, आमठाणा, पालोद, बोरगाव बाजार आणि भराडी ही ६ मंडळे कायम राहतील.



**अजिंठ्याला तालुक्याचा दर्जा, नगरपंचायत आणि अप्पर तहसील मिळावे, म्हणून आम्ही गेल्या २० वर्षापासून लढा अप्पर तहसील कार्यालय मंजूर झाले आहे. आता अजिंठा गावाला पूर्ण तालुका आणि नगरपंचायत बनविण्यासाठी आमचा पाठपुरावा शासन दरबारी सुरूच राहील.**

**मशहूद मुगीस चाऊस, अध्यक्ष,**
**अजिंठा तालुका निर्मिती कृती समिती**

अजिंठा अप्पर तहसीलमध्ये एकूण ५ महसूल मंडळे, ५९ गावे, १३ तलाठी सजा, एक फॉरेस्ट ऑफिस, एक पोलिस ठाणे, ४ जिल्हा परिषद गट आणि ८ पंचायत समिती गणांचा समावेश असेल. या कार्यालयाचे एकूण भौगोलिक क्षेत्र ६५८ चौरस कि. मी. राहणार असून, या अंतर्गत सुमारे १ लाख ९५ हजार लोकसंख्या असेल, तर सिल्लोड तहसील अंतर्गत २ लाख ४५ हजार लोकसंख्या राहणार आहे.

अजिंठा-शिवना रस्त्यावरील पाटबंधारे विभागाच्या कार्यालयाजवळ १८ गुंठे जागेत हे नवीन अप्पर तहसील कार्यालय साकारण्यात येणार आहे. यासाठी लागणारा १ कोटी ४५ लाख रुपयांचा आवर्ती व अनावर्ती खर्च जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जमा झाला आहे. प्रशासकीय पातळीवरील तयारी पूर्ण झाली असून, यासंबंधीची जाहीर सूचना सिल्लोड तहसील, पंचायत समिती, उपविभागीय कार्यालय आणि अजिंठा ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

प्रस्तावित अजिंठा अप्पर तहसील कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात असणार आहेत. याअंतर्गत ८ पंचायत समिती गणांचाही समावेश असणार आहे. या अंतर्गत सुमारे १ लाख,९५ हजार लोकसंख्या असणार आहे.

# रेशन धान्याचा काळाबाजार करणाऱ्या 'कलीम कुरेशी' टोळीवर 'मोक्का'!



**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी :** शासकीय रेशनच्या धान्याची बेकायदेशीर साठवणूक करून त्याची काळाबाजारात विक्री करणाऱ्या टोळीविरुद्ध जिन्सी पोलिसांनी अत्यंत कठोर पाऊल उचलले आहे. या रॅकेटचा पर्दाफाश करत पोलिसांनी टोळीप्रमुख कलीम कुरेशी याच्यासह त्याच्या साथीदारांवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (MCOCA - मोक्का) अंतर्गत कारवाई केली आहे. पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे शहरात रेशन माफियांचे धाबे दणाणले आहेत. या प्रकरणी जिन्सी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १८१/२०२६ आणि १८२/२०२६ दाखल करण्यात आला.तपासादरम्यान, आरोपींनी केवळ स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी एक संघटित टोळी तयार करून हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी या दोन्ही गुन्ह्यांमध्ये मोक्का कलम ३(१)(ii), ३(२) आणि ३(४) चा अंतर्भाव केला असून, २६ जून २०२६ रोजी या कारवाईला वरिष्ठ पातळीवरून मंजुरी घेण्यात आली आहे.ही धडक कारवाई पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस उपआयुक्त (गुन्हे) शशिकांत सातव, पोलीस उपआयुक्त (परिमंडळ-२) रत्नाकर नवले, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) अशोक राजपूत आणि सहायक पोलीस आयुक्त (सिडको विभाग) मनोज पगारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन कल्याणकर, पोलीस निरीक्षक गणेश तावडे, पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव, पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाथरकर तसेच पोलीस अंमलदार संदीप सानप, दीपाली सोनवणे आणि महादेव वणे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस आयुक्त सागर देशमुख यांच्याकडे सोपविण्यात आला असून, फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

**आरोपीचे नाव :** कलीम छोटू कुरेशी (टोळीप्रमुख) फरार, शेख अजहर शेख चाँद कुरेशी-फरार, समीर बाबर कुरेशी-अटक, फहाद लईक शेख-अटक, फरदीन गणी पठाण-अटक, आवेज कुरेशी-फरार .

### रहमानिया कॉलनीत छाप्यात, 17 लाखांचा मुद्देमाल केला होता जप्त

गुन्हे शाखेला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे, १२ जून २०२६ रोजी किराडपुरा येथील रहमानिया कॉलनीतील एम. आर. फंक्शन हॉलच्या खालील गाळ्यावर पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाथरकर आणि त्यांच्या पथकाने छापा टाकला होता. या छाप्यादरम्यान सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत (PDS) गरिबांसाठी येणारा गहू, तांदूळ, मका, ज्वारी आणि साखर यांचा मोठा साठा जप्त करण्यात आला. एवढेच नव्हे तर, महिला व बालविकास विभागाच्या एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाडीतील बालके, गर्भवती व स्तनदा मातांसाठी दिला जाणारा पोषण आहारही या टोळीने बेकायदेशीररीत्या दडवून ठेवल्याचे समोर आले होते. या कारवाईत पोलिसांनी एकूण १७ लाख ६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता.

# आदर्श घोटाळ्याप्रकरणी ठेवीदारांचा 1 जुलैला एल्गार

### जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन; मंत्र्यांना घालणार घेराव ?

**छत्रपती संभाजीनगर :** आदर्श पतसंस्थेत गोरगरीब, वयोवृद्ध ठेवीदारांच्या ठेवी तीन वर्षांपासून अडकून पडल्या आहेत. या प्रकरणाला गती मिळावी आणि ठेवीदारांना न्याय मिळावा यासाठी १ जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मोठे आंदोलन करणार असल्याचे एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांनी शुक्रवारी सांगितले. यानंतरही कारवाई न झाल्यास थेट मंत्र्यांना घेराव घालण्याचा इशाराही त्यांनी दिला.

आदर्श पतसंस्थेतील ५० हजार रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या ठेवी तीन वर्षांपासून अडकून पडल्या आहेत. त्यामुळे त्रस्त ठेवीदारांसाठी हा लढा अधिक तीव्र करण्याची घोषणा जलील यांनी शुक्रवारी सुभेदारी विश्रामगृह येथे केली. यावेळी ठेवीदारांनी जलील यांना भगवी टोपी आणि भगवी शाल घातली. जलील म्हणाले, या प्रकरणाची सुनावणी फास्टट्रॅक न्यायालयात व्हावी, अशी प्रमुख मागणी सोमवारी करण्यात येणार आहे.

संथ गतीमुळे या घोटाळ्यातील ७५ ठेवीदारांचा जीव गेला आहे. यासाठी प्रशासनातील निष्क्रियता जबाबदार असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केल बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमो मोठे आंदोलन करण्यात येईल. त्यानंत जिल्हाधिकाऱ्यांना भेटून तहसीलदारांक प्रलंबित असलेली यासोबतची प्रकरण निकाली काढण्याची मागणी केली जाणा आहे.

त्या खासदारावर कारवाई व्हायला पाहिजे

यावेळी खासदार संजय दिना पाटील यांच्या वक्तव्यावरही टीका करत सर्वांसाठी समान न्यायाची अपेक्षा जलील यांनी व्यक्त केली. हा खासदार कॅमेऱ्यासमोर धमकी देतो. ते सत्तेत असल्याने कुठलीच भीती नाही. त्या खासदारावर कारवाई व्हायला पाहिजे.

# आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर यांचा राज्यस्तरीय आढावा; डॉ. कांचन वानेरे, डॉ. अभय धानोरकर यांच्यासह अधिकाऱ्यांना सूचना

### आरोग्य सेवेत गुणवत्ता, डिजिटलायझेशन आणि उत्तरदायित्वाला प्राधान्य

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** राज्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम, परिणामकारक आणि नागरिकाभिमुख करण्याच्या उद्देशाने आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे अभियान संचालक संजय काटकर यांच्या अध्यक्षतेखाली आरोग्य उपसंचालक कार्यालयात राज्यस्तरीय आढावा बैठक पार पडली. त्यानंतर त्यांनी जिल्हा रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर तसेच राज्य आरोग्य शिक्षण व प्रशिक्षण केंद्र, करमाड येथे भेट देऊन विविध विभागांच्या कामकाजाची पाहणी केली.



बैठकीत पारंपरिक पॉवरपॉईंट सादरीकरणाऐवजी प्रत्येक अधिकाऱ्याशी थेट संवाद साधत त्यांच्या जबाबदाऱ्या, कामकाज आणि तळागाळातील अडचणींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. आरोग्य व्यवस्थेतील डिजिटलायझेशन अधिक सक्षम करण्यासाठी विविध पोर्टलवरील माहिती वेळेत अद्ययावत ठेवणे, तांत्रिक अडचणी दूर करणे आणि फील्ड स्तरावरील माहिती अचूक नोंदविण्यावर भर देण्यात आला. आरसीएच सेवा, एचएलएल लॅबमार्फत अत्यावश्यक तपासणी अहवाल सहा तासांत उपलब्ध करून देण्याची कार्यपद्धती, विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम तसेच एनएचएम निधीच्या वापराचाही आढावा घेण्यात आला.

आरबीएसके कार्यक्रमांतर्गत ३० ऑगस्टपूर्वी सर्व शासकीय शाळांतील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. यावेळी काटकर यांनी तपासणी झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांशी दूरध्वनीवर संवाद साधून सेवांबाबत अभिप्राय घेतला. त्यानंतर जिल्हा रुग्णालयातील अपघात विभाग, प्रयोगशाळा, क्ष-किरण, सोनोग्राफी, सीटी स्कॅन व अतिदक्षता विभागाची पाहणी करून रुग्ण, नातेवाईक आणि कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. रुग्णालयातील स्वच्छता, लॉन्ड्री व्यवस्था आणि रुग्णाभिमुख सेवा कायम राखण्याच्या सूचना देत प्रलंबित अडचणी तातडीने सोडविण्याचे निर्देश दिले. करमाड येथील प्रशिक्षण केंद्रातील विकासकामांचाही आढावा घेत १७ सप्टेंबरपूर्वी सर्व कामे पूर्ण करण्यास सांगितले.

बैठकीस आरोग्य उपसंचालक डॉ. कांचन वानेरे, सहाय्यक उपसंचालक डॉ. दयानंद मोतीपवळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कमलाकर मुदखेडकर, डॉ. संतोष कडले, डॉ. रेखा भंडारे, डॉ. हडकुळे, डॉ. भामरे, डॉ. पद्मजा सराफ, डॉ. छाया आवर्गावकर, डॉ. शैलजा कुप्पास्वामी, डॉ. मुजीब सय्यद, डॉ. प्रशांत बढे, डॉ. वैशाली डकले, डॉ. रवींद्र ढोले यांच्यासह विभागातील सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# ढोरेगावची जिल्हा परिषद शाळा ठरतेय आदर्श; उपशिक्षणाधिकारी राहुल जगताप यांची दाद

### परसबाग उपक्रमाचा शुभारंभ करून विद्यार्थ्यांशी साधला थेट संवाद

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**गंगापूर :** तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा,ढोरेगाव येथे परिविक्षाधीन उपशिक्षणाधिकारी राहुल जगताप यांनी केंद्रप्रमुख राजेश हिवाळे यांच्यासमवेत भेट देऊन शाळेतील शैक्षणिक, भौतिक आणि उपक्रमशील कामकाजाची सविस्तर पाहणी केली. शाळेतील गुणवत्तापूर्ण शिक्षण, अत्याधुनिक डिजिटल सुविधा, स्वच्छता, आकर्षक परिसर व्यवस्थापन आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रम पाहून त्यांनी समाधान व्यक्त करत, "ही शाळा इतर शाळांसाठी आदर्श ठरू शकते," असे गौरवोद्गार काढले.



भेटीदरम्यान त्यांनी वर्गखोल्या, स्मार्ट बोर्ड, संगणक प्रयोगशाळा, स्टेम लॅब, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहे, किचन शेड, क्रीडांगण तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकांकडून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची पाहणी केली. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून विद्यार्थ्यांसाठी उभारण्यात आलेले दर्जेदार शैक्षणिक वातावरण त्यांनी विशेष कौतुकास्पद असल्याचे नमूद केले.

शाळेतील सीसीटीव्ही व्यवस्था, तक्रार व सूचना पेटी, शैक्षणिक संदेशांनी सजलेल्या भिंती, स्वच्छ व सुशोभित परिसर तसेच विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, मूल्यसंस्कार आणि पर्यावरण जागरूकता निर्माण करणाऱ्या उपक्रमांचेही त्यांनी कौतुक केले.

यावेळी राहुल जगताप यांच्या हस्ते शाळेतील परसबाग लागवड उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. विद्यार्थ्यांनी स्वतः लावलेल्या रोपांची व भाजीपाल्याची माहिती त्यांनी आवर्जून जाणून घेतली. पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने निसर्गाशी मैत्री करत वृक्षसंवर्धनात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

भेटीदरम्यान त्यांनी प्रत्येक वर्गात जाऊन विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. अध्ययन, आवडी-निवडी, भविष्यातील ध्येय, दैनंदिन शालेय उपक्रम आणि शैक्षणिक प्रगती याविषयी विद्यार्थ्यांशी मनमोकळ्या गप्पा मारल्या. विद्यार्थ्यांनीही आत्मविश्वासाने प्रश्नांची उत्तरे देत आपल्या गुणवत्तेची छाप पाडली.

या प्रसंगी केंद्रप्रमुख राजेश हिवाळे, केंद्रीय मुख्याध्यापिका अंजली पुन्हे, पदवीधर शिक्षक मनोज घुले, शंकर राऊत, बसवराज उदे, दिलीप धर्माधिकारी, भाऊसाहेब गाढवे, मनोज मस्के, नीलिमा कुलकर्णी, मुग्धा निमसे, सचिन पाटसकर, शामीर शेख, अली बाकोदा, कल्याणी जगताप यांच्यासह शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# महापालिकेत गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तीचा धुडगूस; कर्मचाऱ्यांना धमक्या देत कार्यालयात गोंधळ

**छत्रपती संभाजीनगर :** एका गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तीने थेट कार्यालयात घुसून महापालिकेच्या नगर रचना विभागातील कर्मचाऱ्यांना धमकावत गोंधळ घातल्याने गुरुवारी (दि. २५) काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर सुरक्षारक्षकांना बोलावण्यात आल्यानंतर संबंधिताने तेथून काढता पाय घेतला.

या घटनेची गंभीर दखल घेत महापालिका आयुक्त अमोल येडगे यांनी संबंधिताविरुद्ध पोलिसांत तक्रार दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत. परंतु माहिती अधिकार (आरटीआय) कायदा प्रशासनात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढविण्यासाठी अस्तित्वात असला तरी महापालिकेत काही व्यक्तींकडून आरटीआयच्या आडून अधिकारी, कर्मचारी आणि बांधकाम व्यावसायिकांवर दबाव टाकण्याचे प्रकार वाढल्याची चर्चा आहे.

महापालिकेच्या विविध विभागांकडे माहिती अधिकाराचे अर्ज दाखल होत असले तरी नगर रचना विभाग सर्वाधिक निशाण्यावर असल्याचे दिसून येत आहे. बांधकाम परवानग्या, मंजूर नकाशे, विविध मंजुरींची कागदपत्रे आणि तांत्रिक माहिती मोठ्या प्रमाणावर मागवून त्यातील त्रुटी शोधल्या जातात. त्यानंतर संबंधित अधिकारी किंवा बांधकाम व्यावसायिकांशी संपर्क साधून त्यांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा महापालिका वर्तुळात सुरू आहे.

# शेतातील तुटलेल्या तारेचा शॉक लागून तरुणाचा दुर्दैवी मृत्यु

हिंदू प्रकाशवार्ता / प्रतिनिधी

**परभणी :** पाथरी येथील तालुक्यातील वाघाळा शिवारातील शेतातील विद्युत वाहिनीच्या तुटलेल्या विद्युत तारेचा स्पर्श झाल्याने तेथील एका तरुणाचा मध्यम मृत्यू झाल्याची घटना शनिवार दिनांक 27 जून रोजी सकाळी घडली. अधिक मिळाले माहिती अशी की अतुल रमेशराव काळे वय 28 वर्ष राहणार चाटे पिंपळगाव तालुका पाथरी असे दुर्दैवी मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार अतुल काळे हे शनिवारी 27 जून रोजी सकाळी सुमारे सात वाजण्याच्या दरम्यान वाघाळा शिवारातील त्यांच्या शेतात गेले होते त्यावेळी शेतातील कृषी पंपाला वीज पुरवठा करणाऱ्या विद्युत वाहिनीतील एक तार तुटल्याने त्यांच्या निदर्शनास आले सदरील तार दुरुस्ती करण्याचा प्रयत्न करत असताना त्या तारेमध्ये विद्युत प्रवास सुरू झाल्याने जोरदार विजेचा शॉक बसला या घटनेत त्यांच्या घटनास्थळी जागीच मृत्यू झाला. भेटण्याची माहिती शेती शेजारील शेतकऱ्याने निदर्शनास आल्यानंतर ग्रामस्थांना तसेच पाथरी पोलिसांना कळविण्यात आले माहिती मिळताच पात्री पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे पोलीस हवलदार शिवाजी लटपटे यांच्यासह पोलीस पथकाने घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला घटनेची माहिती कळल्यानंतर वाघाळा पिंपळगाव येथील ग्रामस्थांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली होती.

# व्यसनमुक्त युवा,सशक्त भारत; संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाची अमली पदार्थ विरोधी जनजागृती रॅली संपन्न

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.२७ जून :** संत ज्ञानेश्वर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत अमली पदार्थांच्या वाढत्या गैरवापराला आळा घालण्यासाठी अमली पदार्थमुक्त युवा-सुदृढ भारत या संकल्पनेवर आधारित जनजागृती अभियान राबविण्यात आले.या अभियानाअंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये अमली पदार्थांच्या दुष्परिणामां विषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले.




रॅलीचा शुभारंभ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी अमली पदार्थांना नकार द्या,निरोगी जीवनाचा स्वीकार करा,व्यसनमुक्त युवा,राष्ट्राची खरी शक्ती अशा घोषणा देत परिसरात जनजागृती केली.

याप्रसंगी प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे शारीरिक,मानसिक आणि सामाजिक दुष्परिणाम समजावून सांगितले आणि व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेण्याचे आवाहन केले.

या अभियानामुळे विद्यार्थ्यांमध्ये अमली पदार्थांविषयी जागरूकता निर्माण झाली असून,व्यसनमुक्त समाज निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला. हा कार्यक्रम व रॅली यशस्वी होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ.सुनील चौधरे,दीपक पारधे व डॉ.शिवाजी शिरसाट यांनी परिश्रम घेतले.

# जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणुकीत महायुतीच्या शेतकरी विकास पॅनलला पहिला जाहीर पाठिंबा; समाधान गरुड यांची प्रभाकर काळे यांच्या विजयासाठी साद

हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी

**सोयगाव,दि.२७ जून :** औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.छत्रपती संभाजीनगर संचालक मंडळ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीच्या शेतकरी विकास पॅनलला पहिला जाहीर पाठिंबा मिळाला आहे.सोयगाव सोसायटी मतदारसंघातील उमेदवार समाधान बाबूलाल गरुड यांनी महायुतीच्या शेतकरी विकास पॅनलचे उमेदवार प्रभाकर दयाळराव काळे यांना आपला जाहीर पाठिंबा घोषित करत त्यांना भरघोस मतांनी विजयी करण्याचे आवाहन केले.



सिल्लोड येथील आमदार अब्दुल सत्तार यांच्या जनसंपर्क कार्यालय शिवसेना भवन येथे आयोजित महायुतीच्या शेतकरी विकास पॅनलच्या प्रचार बैठकीत समाधान गरुड यांनी आपल्या भूमिकेची घोषणा केली.

जिल्हा बँकेच्या बळकटीकरणासाठी व शेतकरी हिताच्या दृष्टीने प्रभाकर काळे यांना विजयी करणे आवश्यक असल्याचे त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले.तसेच उपस्थित मतदारांनी मोठ्या संख्येने मतदान करून प्रभाकर काळे यांना भरघोस मतांनी विजयी करावे, असे आवाहन त्यांनी केले.

समाधान गरुड यांनी जाहीर पाठिंबा दिल्याबद्दल मंत्री अतुल सावे,खासदार संदिपान भुमरे,आमदार अब्दुल सत्तार,आमदार सतीश चव्हाण यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात त्यांच्या निर्णयाचे स्वागत केले. बैठकीस महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि जिल्हा बँकेचे मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उभ्या वाळूच्या टिप्पर वर मोटरसायकलचा धडकेने महावितरण कर्मचाऱ्यांचा जागेत मृत्यू

### इंडिकेटर नसलेल्या टिपर मुळे दुर्घटना घडल्याचा आरोप

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:** मानवत तालुक्यातील केकरजवळ शहरात रस्त्याच्या कडेला उभे असलेल्या वाळूच्या टिप्परला अंधारात मोटरसायकलची मागून जोरदार धडक बसल्याने महावितरण विभागाच्या एका कर्मचाऱ्यांचा जागीच मृत्यू झाला. गुरुवारी रात्री साडेआठ वाजता घडली या घटनेमुळे रामेटाकळी सह संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. अधिक माहिती अशी की पालम तालुक्यातील नाव्हा येथील विष्णू पांडुरंग गयाळ वय वर्ष 39 हे मानवत तालुक्यातील रामेटाकळी येथील महावितरणच्या उपकेंद्रावर वरिष्ठ तंत्रज्ञ म्हणून कार्यरत होते. गुरुवारी आपले कामकाज आटपून रात्री ते आपल्या एम एच 22 ए यु ९४०८ रामे टाकळीवरून पाथ्री कडे जात होते . याच दरम्यान केकरजवळा शिवारात रस्त्याच्या कडेला उभे असलेल्या एम एच 21 एक्स6213 या क्रमांकाच्या वाळू वाहतूक करणाऱ्या एका टिप्पर ला महावितरण कर्मचाऱ्यांच्या मोटरसायकलची मागून जोरदार धडक बसली सदरील ही घटना शुक्रवार 26 जून रात्री साडेआठ ते साडेनऊ वाजण्याच्या दरम्यान घडली. सदरील घटना प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार संबंधित टिप्पर रस्त्याच्या कडेला उभा असताना त्यावरील इंडिकेटर पार्किंग लाईट किंवा रिफ्लेक्टर सुरू नव्हते त्यामुळे अंधारात टिप्पर न दिसल्याने विष्णू गयाळ यांची मोटरसायकल थेट टिप्पर च्या मागील भागावर जाऊन आदळली धडक इतकी भीषण होती की गंभीर स्वरूपात जखमी झाल्याने जागेवरच गत प्राण झाला.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911